कारागृह विभागातील गणवेशधारी अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या गणवेश साहित्यात बदल करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेएलई-०५१३/५४७/प्र.क्र.१११/तुरुंग-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
दुसरा मजला, मंत्रालय-४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०१७.

वाचा :

१) अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक व सुधारसेवा, पुणे यांचे पत्र क्र. इतर प्रशासन/ गणवेश वस्तु बदल/ २०१७/ २७०८/ कक्ष-६, पुणे, दि.०१.०४.२०१७.
२) अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक व सुधारसेवा, पुणे यांचे पत्र क्र. इतर प्रशासन/ गणवेश वस्तु बदल/ २०१७/ ७५७०/ कक्ष-६, पुणे, दि.३०.०८.२०१७.

प्रस्तावना :

कारागृह नियमावली १९७९ प्रकरण-९ Staff Uniform & Equipment मधील भाग-II असंवैधानिक नियम (Non-Statutory Rules) मधील परिशिष्ट I नुसार कारागृह विभागातील कारागृह शिपाई ते कारागृह उपमहानिरीक्षक या पदापर्यत सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांना Metropoliton whistle wiith old gold and Brilliant blue silk double cord राहील असे नमुद आहे.

केंद्र शासनाकडील आदर्श कारागृह नियमावली २००३ व २०१६ मधील प्रकरण क्र.३० मधील Staff Development नियम क्र.३०.१७ नुसार Badges of rank for all uniformed cadres in the prison service should similar to that in the police service असे नमुद आहे. केंद्र शासनाकडील आदर्श कारागृह नियमावलीमधील तरतूदी राज्य शासनाने स्वीकृत करणेबाबत केंद्र शासनाने निर्देश दिलेले आहेत.

गृह विभाग, शासन निर्णय दि.१२.०९.२००३ अन्वये कारागृह विभाग हा पोलीस विभागाप्रमाणे राज्याचा कायदा व सुव्यवस्था यंत्रणेचा एक भाग आहे. या दोन्हीही गणवेशधारी शिस्तबध्द सेवा असुन त्यांची कर्तव्ये व जवाबदाऱ्या समान असल्याने सर्वकष विचार करुन कारागृह विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांचेप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. कारागृह विभागामध्ये सर्वसाधारणपणे चार हजार गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी नियुक्त असुन त्यांना पोलीस विभागाप्रमाणे सर्व वेतन, भत्ते व सोई-सुविधा इत्यादी देणेबाबत शासन स्तरावर निर्णय झालेला आहे. त्यानुसार कारागृह शिपाई ते कारागृह उपमहानिरीक्षक या पदापर्यंतच्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना Whistle with Khaki cord गणवेश साहित्यात बदल करण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

कारागृह नियमावली प्रकरण-९ Staff Uniform & Equipment मधील भाग-II असंवैधानिक नियम (Non-Statutory Rules) मधील परिशिष्ट I नुसार Metropoliton whistle wiith old gold and Brilliant blue silk double cord ऐवजी पोलीसांप्रमाणेच (Bombay Police Mannual १९५९, Volume I) मधील Chapter VII मधील तरतुदीनुसार Whistle with Khaki cord असा बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२७१६४३४५२८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jaysing L.Pawara

Digitally signed by Jaysing L.Pawara
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f11b49d608f53d77adcefe8115025d93bfe9db ee3f61b1c150d64818cb09f90c, cn=Jaysing L.Pawara
Date: 2017.09.27 16:33:09 +05'30'

(ज.ल.पावरा)
सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानमंडळ, मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानमंडळ, मुंबई
५) मा.राज्यमंत्री (गृह / शहरे) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री (गृह / ग्रामीण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (अ. व सु.), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) विशेष पोलीस महानिरीक्षक, मुख्यालय, पुणे
११) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, मुंबई
१२) कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे / मध्य विभाग, औरंगाबाद / पूर्व विभाग नागपूर
१३) सर्व अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह / जिल्हा कारागृह / खुले कारागृह
१४) निवडनस्ती तुरुंग-१